# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 13 March 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १३ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- अहमदनगरचं `अहिल्यानगर` नामकरण करण्याला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी
- राज्यातल्या आशा स्वयंसेविकांच्या मानधनात पाच हजार रुपये वाढ
- जालना रेल्वे स्थानकावरच्या कोच देखभाल सुविधा–पीटलाईनचं उद्घाटन

आणि

- छत्रपती संभाजीनगर इथं स्वनिधी से समृध्दी योजनेअंतर्गत कर्ज वाटप मेळावा

****

अहमदनगर शहर तसंच जिल्ह्याचं `अहिल्यानगर` असं नामकरण करण्याला राज्यमंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आली. गृह मंत्रालयाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार हे नामकरण करण्याची शिफारस करण्यात आली असून केंद्राची मान्यता मिळाल्यानंतर अहमदनगर जिल्हा, तालुका तसेच महानगरपालिका यांच्या नामांतरणाची कार्यवाही महसूल आणि नगर विकास विभागाकडून करण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्याच्या वेल्हे तालुक्याचं नामकरण राजगड तसंच मुंबईतल्या आठ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावं बदलण्याच्या निर्णयाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत अद्ययावत मराठी भाषा धोरण जाहीर करण्यात आलं. या धोरणानुसार मराठीतील सर्व बोली भाषांचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार आणि विकास करणं तसंच माहिती तंत्रज्ञान, चॅट जीपीटी सारख्या नवतंत्रज्ञानात मराठीचा जास्तीत जास्त उपयोग करण्यात येईल.

****

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातल्या दहा वर्ष आणि त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

****

राज्यातल्या आशा स्वयंसेविकांना मानधनात पाच हजार रुपयांची वाढ करण्यासही आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. नोव्हेंबर, २०२३ पासून ही वाढ देण्यात येणार आहे. यासाठी दोनशे कोटी एकवीस लाख रूपयांच्या अतिरिक्त खर्चास तसंच नऊशे एकसष्ट कोटी आठ लाख रूपयांच्या वार्षिक खर्चास मान्यता देण्यात आली.

****

राज्यातल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये सध्या कार्यरत असलेल्या २९७ कंत्राटी शिल्पनिदेशकांना कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागात सामावून घेण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी सोळा कोटी नऊ लाख रूपयांच्या वार्षिक खर्चाला यावेळी मान्यता देण्यात आली.

****

जालना खामगाव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी राज्य शासनातर्फे २ हजार ४५३ कोटी रूपये खर्चास मान्यता देण्यात आली. या रेल्वे मार्गासाठी चार हजार ९०७ कोटी ७० लाख रुपये खर्च येणार असून पन्नास टक्के रक्कम राज्य शासन भरणार आहे. या मार्गाविषयी मध्य रेल्वेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. एकूण १६२ किलोमीटर लांब आणि १६ स्थानके असलेला हा मार्ग सुरु झाल्यानंतर या भागातील औद्योगिक विकासाला आणि पर्यटनाला चालना मिळणार आहे.

****

पोलीस पाटलांच्या मानधनात १५ हजार रुपये वाढ, लहान शहरांमध्ये अग्निशमन सेवा बळकट करण्यासाठी १५३ कोटी रूपयांची मंजुरी, भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेत ५० वर्ष मुदतीचे बिनव्याजी कर्ज, शुभमंगल सामूहिक विवाह योजनेला २५ हजार रुपये अनुदान, मानसेवी वैद्यकीय अध्यापकांच्या मानधना वाढ, वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण करण्यासाठी ११ हजार ५८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मान्यता, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत २३ हजार किलोमीटर रस्ते बांधकाम, तसंच जम्मू काश्मिरमधील श्रीनगर विमानतळाजवळ महाराष्ट्र राज्य अतिथीगृह बांधण्यासाठी अडीच एकर भूखंड घेण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

मुंबई परिवहन विभागाच्या १८७ इंटरसेप्टिक वाहनांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज हिरवा झेंडा दाखविला. भविष्यात अपघाती मृत्यू कमी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी परिवहन विभागाला दिल्या. विभागाच्या इंटर सेप्टर वाहनाच्या पहिल्या वाहनाचे सारथ्य महिला चालक मोनिका साळुंखे यांनी केलं.

****

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या इमारतीचे ऑनलाईन भूमिपूजन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

****

अंत्योदय शिधापत्रिकाधारक प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी एक साडी मोफत देण्यासाठी वस्त्रोद्योग विभागामार्फत कॅप्टिव्ह मार्केट योजना सुरू करण्यात आली आहे. कॅप्टिव्ह मार्केट योजनेमुळे राज्यातल्या २४ लाख ८० हजार अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांतील माता-भगिनींना साड्यांचा लाभ मिळाला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेकडून आतापर्यंत १३ लाख १७ हजार साड्यांचे वितरण पूर्ण झालं आहे. वितरित करण्यात आलेल्या साड्यांबाबतच्या तक्रारीसाठी कार्यालयीन वेळेत संपर्क करण्याचं आवाहन वस्त्रोद्योग विभागाच्यावतीनं करण्यात आलं आहे.

****

खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा आज धुळ्यात दाखल झाली. गांधी यांनी धुळे आग्रा रोडवर रोड शो करत छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ उपस्थित जनसमुहाला संबोधित केलं. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, प्रदेश कार्याध्यक्ष आमदार कुणाल पाटील उपस्थित होते. महिला सक्षमीकरणासाठी महिला न्याय हक्क परिषद योवळी घेण्यात आली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी या परिषदेला दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित केलं. `महालक्ष्मी गॅरंटी`, `अर्धी लोकसंख्या पूर्ण हक्क`, `शक्ती का सम्मान`, `अधिकार मैत्री` आणि `सावित्रिबाई फुले महिला वसतिगृह` या पाच महिला गॅरंटी काँग्रेस पक्ष देत असल्याचं खरगे यांनी सांगितलं.

****

माजी मंत्री पद्माकर वळवी यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अशोक चव्हाण, आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, ग्रामिण विकास मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पाला साथ देण्यासाठी वळवी यांनी काँग्रेस सोडून भाजपत येण्याचा निर्णय घेतल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

****

माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी आज नवी दिल्लीत आकाशवाणी आणि दूरदर्शन बातम्यांच्या सुधारित संकेतस्थळांचे उद्घाटन केलं. तसंच सुधारित न्यूज ऑन एआयआर ॲपचे प्रकाशनही केले. त्यांनी प्रसार भारती प्रसारणासाठी सामायिक केलेला ऑडिओ व्हिज्युअल-शब्द देखील जारी केला. प्रसार भारती आता विविध भाषांमधील वृत्तसंस्थांना व्हिडिओ, ऑडिओ, फोटो आणि वाचन साहित्य देण्यासाठी सज्ज असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

जालना रेल्वे स्थानकावर तयार करण्यात आलेल्या कोच देखभाल सुविधा - पिटलाईनचं आज केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते उद्घाटन झालं. या पिटलाईनमुळे जालना इथून नवीन रेल्वे गाड्या सुरु होण्यास अडचण येणार नाही, असं ते म्हणाले. मुंबई - जालना वंदे भारत एक्स्प्रेसचा मुंबई इथून सुटण्याच्या वेळेत बदल करून ही गाडी संध्याकाळी पाच वाजेदरम्यान सोडण्याच्या

सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. नांदेड रेल्वे विभागातलं विद्युतीकरणाचं काम या महिना अखेरीस पूर्ण होईल, अशी माहिती दानवे यांनी यावेळी दिली.

****

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी देशपातळीवर साजरा केला जाणार आहे. केंद्रीय गृहमंत्रालयानं यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. याबद्दल तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यासह मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृतमहोत्सव समितीचे संयोजक युवराज नळे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज स्वनिधी से समृध्दी संमेलन अंतर्गत कर्ज वाटप मेळावा पार पडला. केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ भागवत कराड यांच्या उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यात लाभार्थ्यांना केंद्र तसंच राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ एकाच छताखाली देण्यात आला. यावेळी पी. एम स्वनिधी, प्रधानमंत्री मुद्रा योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, वन नेशन वन रेशन यांच्यासह अन्य विविध योजनांचे स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले होते.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. परभणी जिल्ह्यातल्या गंगाखेड इथली युवती वैष्णवी यादव हिने सर्व नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात मतदार जनजागृती मोहीमेअंतर्गत प्रशासनानं रील आणि शॉर्ट फिल्म तयार करण्याच्या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. पात्र मतदारांनी ३० सेकंदाचे रील आणि पाच मिनीटांची शॉर्ट फिल्म तयार करून २० तारखेपर्यंत स्वीप नांदेडॲटजीमेल डॉट कॉम या ईमेलआयडीवर पाठवावी असं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

बीड जिल्ह्यात शिऊर कासार इथं दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचं येत्या सतरा तारखेला न्यायमूर्ती राजेंद्र अवचट, उच्च न्यायालय मुंबई तथा पालक न्यायमूर्ती बीड न्यायिक जिल्हा यांचे हस्ते या इमारतीचं उद्घाटन होणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नांदेड, घुंगराळा, दिग्रस बूद्रुक ही तीन नवीन महसूल मंडळे दुष्काळ सदृष्य मंडळे म्हणून घोषित करण्यात आली आहेत. या महसूली मंडळासाठी सवलती लागू करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी निर्गमित केले आहे.

****